# धुळे महानगरपालिका, धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त

नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ४५

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समितीची विशेष सभा **सोमवार दिनांक २/०२/२०२६ सकाळी १०-३० वाजता स्व. स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्री.नितीन कापडणीस यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. नितीन कापडणीस | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्री. हेमंत निकम | उपायुक्त |
| ३. | श्रीमती स्वालिहा मालगावे | उपायुक्त |
| ४. | श्री राजेंद्र माईनकर | सहा. आयुक्त |
| ५. | श्री सागर जकातदार | सहा. आयुक्त |
| ६. | श्री. बाळासाहेब तट्टू | मुख्य लेखाधिकारी |
| ७. | श्री. सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्य लेखापरिक्षक |
| ८. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ९. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| १०. | श्री चंद्रकांत उगले | उपअभियंता बांधकाम |
| ११. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य.अभियंता स्थापत्य विभाग |
| १२. | श्री पराग ठाकरे | कनिष्ठ अभियंता विद्युत |
| १३. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता नगररचना |
| १४. | श्री. चंद्रकांत मोरे | उप लेखापाल |
| १५. | श्री.लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १६. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १७. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभि. नगररचना विभाग |
| १८. | श्री हेमंत पावटे | सहा. अभि. नगररचना विभाग |
| १९. | श्री. दुष्यंत महाजन | अग्निशमन विभाग |
| २०. | श्री.अरुण चौधरी | मनपा शिक्षण मंडळ |
| २१. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २२. | श्री रविकिरण पाटकरी | वृक्ष विभाग प्रमुख |
| २३. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २४. | श्री बसीत पठान | सिस्टीम मॅनेजर |
| २५. | श्री. अनिल भडागे | वाहन विभाग |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

मा.प्रशासक:- आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-६८९ मागील प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ४०, ४१, ४२, ४३, ४४ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६६७ दिनांक ०२/०२/२०२६**

प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ४० दिनांक ०३/१२/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६१३ ते ६३८ क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ४१ दिनांक ०५/१२/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६३९ ते ६४२ क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ४२ दिनांक १२/१२/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६४३ ते ६५९ क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ४३ दिनांक ०९/०१/२०२६ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६६० ते ६६५ क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ४४ दिनांक २२/०१/२०२६ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६६६ क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६९० धुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सामुदायीक शौचालय साफसफाई, देखभाल दुरुस्ती ठेका आलेल्या मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. मु. स्व. निरीक्षक धुळे मनपा हददीतील सामुदायीक शौचालय देखभाल दुरुस्ती ई-निविदा प्रसिध्द करण्यात येवुन सदर ईनिविदेत प्राप्त ४ निविदा धारकांपैकी श्री. चंद्रगणेश एंटरप्रायझेस यांना काम देण्यात आले होते. उक्त संस्थेस १ वर्षाकरीता कार्यादेश देण्यात आला होता. दि. १४/०४/२०२५ रोजी त्यांची मुदत संपुष्टात आलेली होती.

मा.आयुक्त तथा प्रशासक विना मुदतवाढ काम कसे सुरु होते.

मा. मु. स्व. निरीक्षक हा विषय आपण ६ मे २०२५ च्या स्थायी समितीत ठेवला होता. सदरचा विषय तहकुब ठेवण्यात आला होता.

मा.आयुक्त तथा प्रशासक निविदा का केली नाही. याचा वर्कऑर्डर दिनांक काय.

मा. मु. स्व. निरीक्षक दि. १३/१०/२०२३ ला वर्कऑर्डर केली होती.

मा.आयुक्त तथा प्रशासक बेसिक रेट कसे ठरविण्यात आले होते.

मा. मु. स्व. निरीक्षक आपण प्रति युनिट प्रमाणे देण्यात आले होते. एका युनिटसाठी रु. ६१२०/- प्रति वर्ष आपल्याकडे कमीत कमी १० सीटचे शौचालय आहे. यात मनुष्यबळ खर्च, लागणारे केमिकल, लाईट बिल, जेटिंग मशिन त्यांचे इंधन या सर्व कॅलक्युलेट करुन रेट घेतला होता.

मा.आयुक्त तथा प्रशासक किती स्वच्छतागृह आहेत व सर्व होतात का.

मा. मु. स्व. निरीक्षक १३५ शौचालये आहे. सर्व साफ होतात. काही नविन बांधले ते सुरु करण्यात आलेले नाही

मा.आयुक्त तथा प्रशासक पठाण याच्या डेली मॉनिटरींगसाठी एक वेगळे फोटो ॲप डेव्हलप करावे. स्वच्छतागृहासाठी आणि सिक्वेन्स टाकुन द्या. स्वच्छता सुरु असतांना फोटो रियल टाईम अपलोड केला पाहिजे जीपीएस टॅगींगसह चार फोटो कंम्पल्सरी करा. याचे बिल कोण रेकॉर्ड करतो.

मा. मु. स्व. निरीक्षक बिलाचे रेकॉर्डींग चे काम मी पाहतो.

मा.आयुक्त तथा प्रशासक या ४ ही मधला एकही फोटो नसला तर बिल जनरेट होणार नाही.या आधारावर त्याचे पेमेंट होईल. ही सिस्टीम २-३ दिवसात जनरेट करावी. पुढील निविदा होईपावेतो मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे. नविन जलद करावी. पुढील निविदेचे रेट व्यवस्थित ठरवा. ६ हजार रेट खुप जास्त होतात. एकच कर्मचारी, एकच मशिन तो मल्टीपल ठिकाणी वापरतो. म्हणुन एवढे रेट योग्य नाही. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६६८ दिनांक ०२/०२/२०२६**

धुळे महानगरपालिका हद्दीतील सामुदायीक शौचालय देखभाल दुरुस्ती करीता ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर ई-निविदेत प्राप्त ४ निविदाधारक पैकी श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस यांचे सर्वात न्युनतम (कमी) दर प्रती युनिट प्रती महिना रु.६, १२०/- प्राप्त झाले होते.

ठरावानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील १३५ युनीट सामुदायीक शौचालय देखभाल दुरुस्ती करीता सदर कामी श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस यांचे सर्वात न्युनतम (कमी) दर प्रती युनिट प्रती महिना रु.६,१२०/- आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच हद्दवाढ भागातील सार्वजनीक शौचालयांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामांचाही समावेश करण्यात यावा. तसेच मागील ठेकेदारांचा करारनामा रद्द करणे व अनुषंगीक कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रशासनाची राहील. तसेच संबंधीत ठेकेदाराचे काम समाधानकारक असल्यास त्यांना नियमाप्रमाणे दरवर्षी नैसर्गिक दरवाढ देवुन मुदतवाढ देण्यात यावी असे उक्त ठरावात नमुद आहे.

उक्त संस्थेस दिनांक १३/१०/२०२३ पासुन १ वर्षाकरीता धुळे महानगरपालिका हद्दीतील १३५ युनिट सामुदायीक शौचालय साफसफाई, देखभाल दुरुस्ती करीता कार्यादेश देण्यात येवुन मनपा हिताचा करारनामा करुन घेण्यात आला होता.

सदर संस्थेची उक्त कामाची १ वर्षाची मुदत हि दिनांक १३/१०/२०२४ रोजी संपुष्टात आल्याने तसेच उक्त कालावधीत आचारसंहिता लागण्याची शक्यता असल्याने कार्यप्रणालीत अडचण निर्माण होवु नये यासाठी श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस यांना मागील मंजुर दरानुसार ६ महिन्याकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली होती.

श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस, धुळे यांनी पत्र सादर करुन उक्त कामात १०% दरवाढ करुन मिळणे बाबत मागणी पत्र सादर केले होते. त्यानुसार विभागामार्फत उक्त संस्थेस सदर कामाकरीता नैसर्गिक दरवाढ करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला असता त्यास मा.आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी मान्यता दिलेली आहे.

त्याअनुषंगाने सदर संस्थेची मुदतवाढ केलेली कामाची ६ महिन्याची मुदत हि दिनांक १४/४/२०२५ रोजी संपुष्टात आलेली असुन अद्याप पावेतो एकुण १० महिने कालावधी होत आहे.

श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस या संस्थेस पुढील मुदतवाढ देण्यात यावी किंवा नविन ई-निविदा प्रसिध्द करण्यात यावी याबाबत अहवाल सादर करण्यात आला असता त्यास उक्त ठरावानुसार सदर संस्थेच्या सुरु असलेल्या कामाचे पुनश्च वस्तुनिष्ठ मुल्यमापन व

सद्यस्थितीत सार्वजनिक शौचालयांची पहाणी करुन अहवाल सादर करावा तोपर्यंत सदर प्रस्ताव तहकुब ठेवण्यात आलेला होता.

सद्यस्थितीत श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस या संस्थेमार्फत १३५ युनिट सामुदायीक शौचालयाचे साफसफाई व देखभाल दुरुस्तीचे कामकाज सुरु आहे. त्याअनुषंगाने श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस यांना उक्त कामाची मुदतवाढ देण्यात यावी किंवा नविन ई-निविदा प्रसिध्द करण्यात यावी याबाबत सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सामुदायीक शौचालय साफसफाई, देखभाल दुरुस्ती कामी श्री चंद्रगणेश एंटरप्राईजेस यांना नविन निविदा प्रक्रिया होईपावेतो मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

विभागाने तातडीने नविन ई निविदा प्रसिध्दीबाबत कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६९१ — नागरी दलितेतर योजने अंतर्गत सन 2025-26 देवपूर भागांतील स.नं.52 येथील उद्यानासमोर पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — नागरी दलितेतर योजनेअंतर्गत सन २०२५-२६ देवपुर भागातील स.नं. ५२ येथील उद्यानासमोर पेव्हर ब्लॉक बसविणे काम प्रस्तावित आहे. त्यासाठी मा. जिल्हाधिकारी महोदय यांनी आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामी ई निविदा मागविण्यात येवुन प्राप्त ३ निविदांपैकी मे. सानिका कन्स्ट्रक्शन यांची शे. ०.०१ टक्के कमीने सर्वात कमी दराची निविदा प्राप्त असुन दरास मंजुरीस्तव सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झाला आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६६९ दिनांक ०२/०२/२०२६**

नागरी दलितेतर योजने अंतर्गत सन 2025-26 देवपूर भागांतील स.नं.52 येथील उद्यानासमोर पेव्हर ब्लॉक बसविणे बाबतच्या कामास मा. जिल्हाधिकारी सो.धुळे यांनी क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/963/2025 दि.31/10/2025 नुसार उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.40,34,203/-मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्यकारी अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.212/2025 दि.31/10/2025 अन्वये रक्कम रु. 40,34,203/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले होते. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून खालीलप्रमाणे निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| 1 | **मे.सानिका कन्सट्रक्शन** | **शे.0.01 % कमीने** | **सर्वात कमी दर** |
| 2 | **मे. Prudence इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि** | **अंदाजपत्रकीय दराने** | |
| 3 | **मे.मिलिंद मुडावदकर** | **शे.5.00% जास्तीने** | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे. सानिका कन्सट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे रु.40,33,795/- इतक्या रक्कमेचे असून शे.0.01 % कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे. सानिका कन्सट्रक्शन यांचे दर शे.0.01 % कमी दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे. सानिका कन्सट्रक्शन यांची शे.0.01 % कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे स्थायी समितीपुढे सादर करण्यात आले आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, नागरी दलितेतर योजने अंतर्गत सन 2025-26 देवपूर भागांतील स.नं.52 येथील उद्यानासमोर पेव्हर ब्लॉक बसविणे कामी आलेले मे. सानिका कन्सट्रक्शन यांचे दर शे.0.01 % कमी यांस वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६९२ भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव श्वान संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करणे साठी शेल्टर हाऊस बांधणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता शासन निर्णयानुसार भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव श्वान संघर्ष टाळण्यासाठी शेल्टर हाऊस बांधणेबाबत निश्चीत करण्यात आले होते. सदरचे शेल्टर हाऊस हे अवधान येथे मनपाची जागा आहे. सदर कामासाठी एकुण ७०मिटर बाय ४० मिटर अशी एकुण २८०० चौ.मि. जागेची आवश्यकता आहे. याबाबत अंदाजपत्रक केले असता २ कोटी ८९ लाख ८९ हजार रुपये अपेक्षीत आहे. तसेच सदरचा प्रस्ताव वेशिष्टयपुर्ण व नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत निधी मागणीसाठी मा. जिल्हाधिकारी महोदय यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. या योजनेतुन प्र. मा. मिळाल्यास त्यातुन खर्च करण्यात येईल अन्यथा मनपा निधीतुन सदरचा खर्च करावा लागेल.

मा.आयुक्त तथा प्रशासक हे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार करतोय. याची लवकरात लवकर निविदा प्रसिध्द करावी. डीपीडीसी तुन मागणी केली आहे. शक्यता कमी आहे. मिळाले तर ठिक नाहीतर मनपा बजेटमध्ये असे शिर्षक तयार केले आहे. यासोबत जे एबीसी सेंटर आहे.त्याला देखील एक्सटेंड करावे लागेल. त्याचे देखील जे. ई. पाठवुन पिंजऱ्याचे एस्टीमेट करा. त्याचे टेंडर फलॅश करावे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६७० दिनांक ०२/०२/२०२६**

शासन निर्णयानुसार भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव श्वान संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करणे साठी भटक्या श्वानांना पकडून त्यांना कायम स्वरूपी शेल्टर हाऊस मध्ये ठेवणे बाबत निर्देशित केले आहे.

तसेच संदर्भ क्र.2 अन्वये भारतीय जीवजंतू कल्याण बोर्ड, भारत सरकार यांनी भटक्या श्वानांना पकडून त्यांना कायम स्वरूपी शेल्टर हाऊस मध्ये ठेवणे बाबत Standard Operating Procedure (SOP) नुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

उक्त कामी भारतीय जीवजंतू कल्याण बोर्ड, भारत सरकार यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचने नुसार 1000 भटक्या श्वानांसाठी शेल्टर हाऊस बांधणे करिता अंदाजपत्रक तयार

करण्यात आले असून सदर कामास रक्कम रु.2,89,89,818/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.सदर कामासाठी एकूण 70 मी x 40 मी = 2,800 चौ.मी. जागेची आवश्यकता आहे.

या अनुषंगाने अवधान सर्व्हे नं. 62/1 येथे मनपा मालकीची जागा उपलब्ध असून सदर ठिकाणी भटक्या श्वानांसाठी शेल्टर हाऊस बांधणे करिता मे.प्रशासकीय महासभा क्र.29 दि.10/12/2025 अन्वये मान्यता दिली आहे.

सदर शेल्टर हाऊस बांधणे करिता एकूण रक्कम रु.2, 89, 89,818/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.सदर कामावरील खर्च 25 लक्ष पेक्षा जास्तीचा असल्याने सदरचा विषय आर्थिक व प्रशासकीय मान्यतेसाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव श्वान संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करणे साठी शेल्टर हाऊस बांधणेसाठी येणारा खर्च रक्कम रु.2, 89, 89,818/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. याकामी तातडीने निविदा प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६९३ — मनपा निधी सन 2025-26 अंतर्गत पाचकंदील भागांतील सि.स.नं.3052 फळ मार्केट व सि.स.नं.3051 शिवाजी महाराज मार्केट पुर्नविकास करणेकामी आलेल्या निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता — मनपा निधी सन २०२५-२६ अंतर्गत पाचकंदिल भागातील सिसनं. ३०५२ येथे फळ मार्केट व सिसनं. ३०५१ शिवाजी महाराज मार्केट पुर्नविकास करणेसाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. ई निविदा मागविण्यात येवुन त्यात २ निविदा धारकांनी भाग घेतले होते. त्यात मे. बोरसे ब्रदर्स इंजि. आणि कॉन्ट्रक्टर्स प्रा. लि. यांची अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी दराची निविदा मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झाला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — जागा मालकीची खात्री केली का. आता बरेच लोकांचे मध्येच पत्र येत आहे. आता एका व्यक्तीने छत्रपती शाहु नाटय मंदिर क्लेम केले आहे ते खाजगी मालकीचे आहे म्हणुन मालकीचे दस्तऐवज व्यवस्थित तपासावे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६७१ दिनांक ०२/०२/२०२६**

मनपा निधी सन 2025-26 अंतर्गत पाचकंदील भागांतील सि.स.नं.3052 फळ मार्केट व सि.स.नं.3051 शिवाजी महाराज मार्केट पुर्नविकास करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका धुळे स्थायी समिती ठराव क्र.639 दि.05/12/2025 अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. **२२,१७,६१,९७४/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उप.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./२३९/२०२५-२६ **दि.०४/१२/२०२५**अन्वये रक्कम रु. **२२,१७,६१,९७४/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.बोरसे ब्रदर्स इंजि.आणि कॉट्रन्क्टर्स पी.वी.टी. एल.टी.डी. | अंदाजपत्रकीय दराने | **सर्वात कमी दर** |
| २ | मे. बी.आर.भदाणे बिल्डकॉन एल.एल.पी. | शे.२ .००% जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ **मे.बोरसे ब्रदर्स इंजि.आणि कॉट्रन्क्टर्स पी.वी.टी. एल.टी.डी**. यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **२२,१७,६१,९७४/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ **मे.बोरसे ब्रदर्स इंजि.आणि कॉट्रन्क्टर्स पी.वी.टी. एल.टी.डी**. यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ **मे.बोरसे ब्रदर्स इंजि.आणि कॉट्रन्क्टर्स पी.वी.टी. एल.टी.डी**. यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, मनपा निधी सन 2025-26 अंतर्गत पाचकंदील भागांतील सि.स.नं.3052 फळ मार्केट व सि.स.नं.3051 शिवाजी महाराज मार्केट पुर्नविकास करणेकामी **मे.बोरसे ब्रदर्स इंजि.आणि कॉट्रन्क्टर्स पी.वी.टी. एल.टी.डी**. यांच्या आलेल्या अंदाजपत्रकीय दरास वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६९४ — मनपा निधी सन 2025-26 अंतर्गत पाचकंदील भागांतील सि.स.नं.2927 लालबहादूर शास्त्री भाजीपाला मार्केट व सि.स.नं.2913 शंकर मार्केट पुर्नविकास करणेकामी आलेल्या निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्याल्यीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — मनपा निधी सन २०२५-२६ अंतर्गत पाचकंदिल भागातील सिसनं. २९२७ लाल बहादुर शास्त्री भाजीपाला मार्केट व सिसनं. २९१३ शंकर मार्केट पुर्ण विकास करणेसाठी ईनिविदा मागविण्यात आली होती. त्यात २ निविदाधारकांनी भाग घेतले होते त्यात बोरसे ब्रदर्स यांनी निविदा अंदाजपत्रकीय दराने आलेली आहे. दरास मंजुरीस्तव सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे राहतील.

मा.आयुक्त तथा प्रशासक — वरील विषयाप्रमाणेच समान सुचना राहतील. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६७२ दिनांक ०२/०२/२०२६**

मनपा निधी सन 2025-26 अंतर्गत पाचकंदील भागांतील सि.स.नं.2927 लालबहादूर शास्त्री भाजीपाला मार्केट व सि.स.नं.2913 शंकर मार्केट पुर्नविकास करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका धुळे **स्थायी समिती ठराव क्र.६३९ दि.०५/१२/२०२५** अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. **३१,९३,६४,६२६/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उप.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./२४०/२०२५-२६ **दि.०४/१२/२०२५** अन्वये रक्कम रु. **३१,९३,६४,६२६/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे.बोरसे ब्रदर्स इंजि.आणि कॉट्रन्क्टर्स पी.वी.टी. एल.टी.डी. | अंदाजपत्रकीय दराने | **सर्वात कमी दर** |
| २ | मे. बी.आर.भदाणे बिल्डकॉन एल.एल.पी. | शे.२ .००% जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ **मे.बोरसे ब्रदर्स इंजि.आणि कॉट्रन्क्टर्स पी.वी.टी. एल.टी.डी**. यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **३१,९३,६४,६२६/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ **मे.बोरसे ब्रदर्स इंजि.आणि कॉट्रन्क्टर्स पी.वी.टी. एल.टी.डी**. यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ **मे.बोरसे ब्रदर्स इंजि.आणि कॉट्रन्क्टर्स पी.वी.टी. एल.टी.डी**. यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, मनपा निधी सन 2025-26 अंतर्गत पाचकंदील भागांतील सि.स.नं.2927 लालबहादूर शास्त्री भाजीपाला मार्केट व सि.स.नं.2913 शंकर मार्केट पुर्नविकास करणेकामी **मे.बोरसे ब्रदर्स इंजि.आणि कॉट्रन्क्टर्स पी.वी.टी. एल.टी.डी**. यांच्या आलेल्या अंदाजपत्रकीय दरास वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६९५ — धुळे महानगरपालिका मार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ व्या अनुषंगाने मत गणना संगणकीय प्रणाली विकसित करणेकामी देयक अदा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. सिस्टिम मॅनेजर — धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने मतगणना प्रणाली विकसीत करणेकामी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ४,२०,०००/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. जाहिर निविदा प्रसिध्द करणेत येवुन त्यात ३ निविदाधारकांनी भाग घेतला होता त्यात लोटस इनकॉर्पोरेट यांचे सर्वात कमी दर आले होते. मंजुरीस्तव सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर.

मा.आयुक्त तथा प्रशासक — सदरची प्रणाली व्यवस्थित अपडेट झालेली नाही. याबाबत दंडात्मक शुल्क आकारण्यात यावे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६७३ दिनांक ०२/०२/२०२६**

धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६च्या अनुषंगाने मत गणना संगणकीय प्रणाली विकसित करणे आवश्यक असल्याने बाजार भावाप्रमाणे त्याचे स्पेसिफिकेशन खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| Sr.No. | Particular | Qty | Rate | Total |
|---|---|---|---|---|
| 1 | Online Municipal Corporation Election Software Implementation | 1 | 170000 | 170000 |
| 2 | Windows SERVER+SQL SERVER | 1 | 250000 | 250000 |
| | TOTAL | | | 420000 |

उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु ४२००००/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/संवि/ २५३८/२०२५-२६ दि.१२/०१/२०२६अन्वये दि.१२/०१/२०२६ रोजी धुळे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर निवडणूक तात्काळ असल्याने अल्पमुदतीची जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१३/०१/२०२६ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी खालीलप्रमाणे निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | लोटस इनकॉर्पोरेट | ४१९७५०/- | सर्वात कमी दर |
| २ | वेब सपोर्टस | ९५८०००/- | |
| ३ | रजनी एजन्सी | ११४६५००/- | |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता मे.लोटस इनकॉर्पोरेट. यांची कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे.सदर निविदेची तुलना केली असता मे.लोटस इनकॉर्पोरेट यांच्या निविदेतील कमी दर हा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहे.

सदर मतगणना संगणकीय प्रणाली विकसित करणेसाठी मे.लोटस इनकॉर्पोरेट यांचेकडून कामाची आवशकता लक्षात घेऊन तातडीने करून घेण्यात आलेले आहे.सदर संस्थेचे निविदा दर मान्य करून देयक अदा करणेबाबत प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिका मार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ व्या अनुषंगाने मत गणना संगणकीय प्रणाली विकसित करणेकामी झालेला खर्च रु. ४१९७५०/- मात्रला मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रणाली वेळेवर कार्यान्वित न झाल्याने दंडात्मक शुल्क वसुलीबाबत कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६९६ धुळे महानगरपालिका मालकीचे राजर्षी छत्रपती शाहु महाराज नाट्य मंदिर भाडे तत्वावर वापरास देणे करीता शुल्क व नविन नियमावली लागु करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक मे. महासभेत दिलेल्या समान सुचना राहतील.सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६७४ दिनांक ०२/०२/२०२६**

राजर्षी छत्रपती शाहु महाराज नाटयमंदिर मागिल सन २०१५ पासुन १० वर्ष मे श्री कृष्ण खांडसरी तर्फे व्यवस्थापक श्री राजेद्र भावसार धुळे यांना भाडेतत्वावर वापरण्यास देण्यात आलेले होते. तरी सादर नाट्य मंदिर संदर्भात मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे समक्ष दि.२८/११/२०२५ रोजी बैठक घेण्यात आलेली असता त्या संदर्भात खालील प्रमाणे बाबी लक्षात आलेल्या आहेत.

सदरचे नाट्य मंदिर हे मे. श्री खांडसरी व्यवस्थापक श्री राजेंद्र भावसार यांना देण्यात आलेल्या नाटय गृहाची मुदत संपलेली आहे त्यामुळे सदरचे नाट्य मंदिर ताब्यात घेणे आवश्यक आहे.

त्या प्रमाणे सदरचे नाट्य मंदिर ताब्यात घेण्यासाठी मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी मान्यता दिल्यानुसार सदरचे नाट्य मंदिर ताब्यात घेण्यात आलेले आहे तरी सदरचे नाट्य मंदिर यापुढे खाजगी एजन्सीला न देता सदर नाट्य मंदिर धुळे मनपा स्व:ता दुरुस्ती करुन ते भाडे तत्वावर देण्यास सुचित केल्यानुसार सदरचे प्रकरण मालमत्ता व्यवस्थापन विभागकडे संपुर्ण कागदपत्रास वर्ग करणे सुचविले आहे तसेच सदर नाट्य मंदिर संदर्भात भाडे आकारणी अनामत रक्कम कार्यक्रम सत्राची वेळ तसेच नाट्य मंदिर संदर्भातील नियमावली तयार करणेस आवश्यक आहे त्यानुसार खालील प्रमाणे दर व नियमावली तयार करणेत आलेली आहे.

**राजर्षी छत्रपती शाहु महाराज नाट्य मंदिर उपलब्ध सुविधा**

१.प्रेक्षकांसाठी पुशबॅक स्वरुपाची ८६० प्रेक्षकांकरीता बैठक व्यवस्था
२.पहिल्या मजल्यावर मोठे सभागृह व अभ्यागत कक्ष
३.वाहनतळा करीता भरपुर प्रमाणात मोकळे मैदान
४.कलावंताकरीता दोन (ग्रीन) कक्ष व एक अतिरीक्त कक्ष
५.अभ्यागतांकरीता (चार) व्ही.आय.पी. कक्ष
६.प्रशस्त प्रकाश व्यवस्था
७.अनुनाद संरक्षण प्रणाली
८.कलाकारांना प्रदर्शन करण्यासाठी १०.५०मी x ११.६०मी चा असा भव्य रंगमंच
९.परिपुर्ण अशी नेपथ्या व्यवस्था
१०.विद्युत पुरवठयाकरीता जनित्राची व्यवस्था आयोजकांना स्वत:च्या स्तरावर करुन यावी लागेल.
११. अतिरिक्त प्रकाश व्यवस्था व ध्वनीक्षेपण व्यवस्था आयोजकांना करावी लागेल.

तरी वरील प्रमाणे दरांना दर सुधार समिती सभा क्र.१ मध्ये मान्यता मिळणेस सादर करणेत आलेले आहेत खालील प्रमाणे दरांना मान्यता मिळालेली आहे.

| अ.क्र. | बाब | भाड्याचे प्रस्तावित दर | अनामत रक्कम दर |
|---|---|---|---|
| १ | संस्कृतिक कार्यक्रम | प्रति सत्र रु.५,०००/- | २,५००/- |
| | | दोन सत्र रु.१०,०००/- | ५,०००/- |
| | | संपुर्ण दिवस रु.१४,०००/- | ७,०००/- |
| २ | शैक्षिणक कार्यक्रम | प्रति सत्र रु.२,५००/- | १२५०/- |
| | | दोन सत्र रु.५,०००/- | २,५००/- |
| | | संपुर्ण दिवस रु.७,०००/- | ३,५००/- |
| ३ | महानगरपालिका शाळा | निशुल्क | |
| ४ | स्थानिक हौशी कलावंत | अ.क्र.१ च्या ५०% सवलत | |
| ५ | इनडोअर हॉल पहिला मजला | प्रति दिवस | ५००/- |
| | | ७ दिवसांसाठी | २,१००/ |
| | | १५ दिवसांसाठी | ३,०००/- |
| | | १ महिन्यासाठी | ५,०००/- |
| ६ | नाट्यगृहा मागील खुले मैदान<br>लग्न समारंभ/ प्रदर्शन<br>अनुषंगीक कार्यक्रम | प्रति दिन | ५,०००/- |
| भाडयाच्या रकमेवर वस्तु व सेवा कर १८% प्रमाणे अतिरिक्त आकारण्यात येईल. | | | |

उक्त प्रमाणे धुळे महानगरपालिकेमार्फत छत्रपती शाहू महाराज नाट्यगृह चालवणेस तसेच दरसुधार समितीने केलेल्या शिफारशीनुसार भाडे व अनामत रक्कम लागू करणेस प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्तावानुसार व झालेल्या चर्चेनुसार, धुळे महानगरपालिका मालकीचे राजर्षी छत्रपती शाहु महाराज नाट्य मंदिर भाडे तत्वावर वापरास देणे करीता दरसुधार समितीने शिफारस केलेले भाडे शुल्क व अनामत रक्कम निश्चीत करणेस व प्रस्तावात नमूद अटी शर्ती तसेच नविन नियमावली लागु करणेस वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६९७ धुळे महानगरपालिका हद्दीतील घनकचरा संकलन व वाहतुक करणेकामी दिलेल्या कामास मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपायुक्त आपण सुरुवातीला निविदा प्रक्रिया केली होती त्यावेळी २ वर्षाच्या हिशोबाप्रमाणे ती केली होती. ज्या वेळी निविदा प्रक्रिया पुर्ण झाली. जे कंत्राटदार यांनी भाग घेतला. त्यावेळी त्यांना १ वर्षाची वर्क ऑर्डर दिली होती. त्यात आपण अटी केल्या होत्या त्यात नविन वाहने खरेदी करणे जेवढे वाहने आहे तेवढे वाहने सोडुन इतर वाहनांची व्यवस्था संबंधीत कंत्राटदाराने करणे या गोष्टी नमुद केल्या होत्या त्या अनुषंगाने कंत्राटदाराने एक पत्र दिलेले आहे की,संकलनासाठी डंपर, कॉम्पॅक्टर, घंटागाडया या त्याने स्वत: विकत घेतल्या आहे. एक वर्षाची मुदतवाढ देण्यात यावी. अशी मागणी केली आहे. मुळ निविदा २ वर्षाची होती पण वर्कऑर्डर एकच वर्षाची केली होती.

मा.आयुक्त तथा प्रशासक निविदा ज्या कालावधीची झाली वर्कऑर्डर त्याच कालावधीची झाली पाहिजे. यात माझ्या सुचना राहतील. यात त्याने मुलभुत गोष्ट अशी की, कंत्राटदाराने हाऊस टु हाऊस

कलेक्शन केले पाहिजे, प्रत्येक घरावर स्कॅनिंग कोड बसविले आहे. त्याचे देयक अदा करतांना स्कॅनिंग कोडचे परसेंटेज विचारात घ्यावे.

मा. उपायुक्त — आपण याबाबत स्पष्ट नमुद केले की, जे स्कॅनिंग कोड दरवाजांवर आहे. ज्याचे रेकॉर्ड मनपाकडे आहे त्या स्कॅनिंगचा रिपोर्ट त्याने सादर केल्याशिवाय बिल प्रोसेस होणार आहे. संपुर्ण गाडयांना जीपीएस बसवतो आहे. येत्या दोन दिवसात जीपीएस बसवुन होतील. तसेच स्पीड लॉक देखील टाकले आहे. तसेच घंटागाडी चालकाने रुट फॉलो केला की नाही याचे मॉनिटरिंग केले जाणार आहे. जो रुट फॉलो करणार नाही त्यासाठी दंडाची तरतुद सुध्दा केली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — यात स्कॅनिंग परसेंटेज ८० टक्केच्या वर असावे. आता मुख्य रस्ते व बाजारपेठ यावर लक्ष द्यावे. कोड जुने आहेत जेथे नसतील तेथे बसवुन घ्यावे. अद्ययावत करावे. याबाबत उपायुक्तांनी स्वच्छता निरीक्षकांना पत्र द्यावे. जे स्वच्छता निरीक्षक त्याला गांभीर्याने घेत नाही त्यांचेदेखील वेतन अदा करण्यात येवु नये. प्रभागरचना नविन झाली आहे. आणि स्वच्छता निरीक्षकांची पुर्नरचना झालेली नाही. पुढील २ तासात पुर्नरचनेची ऑर्डर झाली पाहिजे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६७५ दिनांक ०२/०२/२०२६**

धुळे महानगरपालिका क्षेत्रातील घरोघरी निर्माण होणारा दैनंदिन कचरा संकलन आणि वाहतूक करणे व गटारे आणि नाल्यातील गाळ संकलन करणे व घनकचरा व्यवस्थापनाच्या कामावर देखरेख आणि देखरेखीसाठी पात्र मनुष्यबळ प्रदान करण्याकामी मक्ता देण्यात आला आहे.

मे. स्थायी समिती प्रशासक ठराव क्र.587 दिनांक 10/10/2025 अन्वये भाग्यदीप एंटरप्राईजेस प्रा.लि. यांनी 1 ते 4 कामाकरीता वाटाघाटी अंती सादर केलेले अंदाजपत्रकीय एकुण दर रुपये 8050/- मात्रला (4,95,118/- प्रति दिवस खर्च) यास पुढील 1 वर्षाकरीता कामास व दरास मान्यता देण्यात आलेली असुन त्यानुसार उक्त संस्थेस 1 वर्षे कालावधी करीता काम देण्यात आले असुन काम समाधानकारक असल्यास मे. महासभेच्या मान्यतेने पुढील 1 वर्षे कालावधीसाठी कामाची मुदतवाढ देण्यात यावी असे नमुद आहे.

करारनाम्यातील पान क्र. 17 कामाचा कालावधी या शिर्षकातील अ.क्र. 1 मध्ये सदर कामाचा कालावधी हा 1 वर्ष आहे तथापि उक्त् संस्थेचे काम समाधानकारक असल्यास मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांची मान्यता घेऊन पुढील मुदतवाढ देण्यात येईल असे नमुद आहे. कार्यादेशात अ.क्र.7 मध्ये कामाची मुदत 12 महिने दर्शविण्यात आली आहे.

मे.भाग्यदिप्स वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे यांनी सदरच्या कामासाठी 20 गाड्या आणि 5 कॉम्पॅक्टर या वाहनांची नवीन खरेदी केलेली आहे. तसेच हि आम्ही केलेली इनव्हेसमेंट 1 वर्ष कालावधीत रिकव्हर होणार नाही. तरी निविदेमधील मुळ तरतुदीप्रमाणे सदरचे काम 2+1 असे एकूण 3 वर्षाकरिता करून देणेत यावे जेणेकरून सदरचे काम आम्हाला अजून पूर्ण क्षमतेने करण्यास मदत होईल असे विनंतीपत्र सादर केले आहे.

त्याअनुषंगाने भाग्यदिप्स वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पणे यांनी उक्त कामाची सलग 3 वर्ष मुदतवाढ मागणी केलेली असून उक्त बाबत विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिका हद्दीतील घनकचरा संकलन व वाहतुक करणेकामी दिलेल्या कामास १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

याबाबत घरस्तरावर कचरा संकलन पूर्ण क्षमतेने होणेसाठी स्कॅनिंग कोड करण्यात यावे. तसेच त्याप्रमाणे मूल्यमापन करण्यात यावे. ८० टक्के स्कॅनिंग कोड होईल याची जबाबदारी

संबंधित स्वच्छता निरीक्षक व मुकादम यांची राहिल. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६९८ — अमृत २ अभियाना अंतर्गत प्रगतीत असलेल्या सोलर सिस्टीम करीता ट्रान्सफॉर्मर व अनुषंगीक कामे करणेच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे व ई निविदा प्रसिध्द करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. कनिष्ठ अभियंता — केंद्र शासन पुरस्कृत अमृत २ अभियानाअंतर्गत धुळे मनपा सुकवद व बाभळे पाणी पुरवठा केंद्र या ठिकाणी प्रत्येकी १ मे वॅट क्षमतेचे ऑन ग्रिड सोलर सिस्टीमचे काम प्रगतीत आहे. उक्त अंदाजपत्रकीय बाबीमध्ये सौर उर्जेतुन निर्माण होणारी विज निर्मीती महावितरण च्या ग्रीडला जोडणी करण्यासाठी आवश्यक ट्रान्सफॉर्मर व अनुषंगीक बाबी कार्यादेशात नसल्याने. उक्त आवश्यक बाबी व कामावरील अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु. २,५१,७७,५१३/- जीएसटी करासह आवश्यक आहे. सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकात सदर कामाकरीता आवश्यक तरतुदीकरीता मान्यताप्राप्त आहे. आर्थिक व प्रशासकीय मान्यता होणेस व ई निविदा कार्यवाहीकरीता मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त तथा प्रशासक — प्रकल्प १०० टक्के कार्यान्वित झाला पाहिजे याची जबाबदारी विभागाची राहिल. तसेच एमएसईडीसीएलची सोबत अ‍ॅग्रीमेंटची कार्यवाही सुरु करा. निविदा प्रसिध्द करा व करतांना सर्व बाबी चेक करा अनावश्यक बाबी असतील त्या काढुन टाका सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६७६ दिनांक ०२/०२/२०२६**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २ अभियांना अंतर्गत धुळे महानगरपालिका सुखवद व बाभळे पाणी पुरवठा केंद्र या ठिकाणी प्रत्येकी १ मे. वॅट क्षमतेचे ऑन् ग्रीड सोलर सिस्टीम चे काम प्रगतीत आहे.

उक्त अंदाजपत्रकिय बाबी मध्ये सौर ऊर्जेतुन निर्माण होणारी विज निर्मीती महावितरण च्या ग्रीड ला जोडणी करण्यासाठी आवश्यक ट्रान्सफॉर्मर व अनुषंगीक बाबी चा अंतर्भाव कार्यादेशात अंतर्भुत नाही. तथापी सदरच्या बाबी शिवाय सदरील प्रकल्पीय काम पुर्ण होणार नाही. करीता सोलर प्रकल्प कार्यान्वित होणेसाठी सदरील काम करणे आवश्यक आहे.

उक्त प्रमाणे आवश्यक साहित्य व कामा करीता अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु. २,५१,७७,५१३/- जी.एस.टी. करासह आवश्यक आहे. सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकात सदरच्या कामा करीता आवश्यक आहे. सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकात सदरच्या कामाकरीता आवश्यक तरतुदी करीता मान्यता प्राप्त आहे.

वरील प्रमाणे मनपा निधितून तरतुद उपलब्ध असल्याने तसेच सदरील काम मनपा आर्थिक हिताचे असल्याने अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु. २,५१,७७,५१३/- मात्र करीता आर्थिक व प्रशासकीय मान्यता होणेस व ई-निविदा कार्यवाही करीता मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, अमृत २ अभियाना अंतर्गत प्रगतीत असलेल्या सोलर सिस्टीम करीता ट्रान्सफॉर्मर व अनुषंगीक कामे करणेच्या कामास व खर्चास

आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.तसेच ई निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रकल्प १०० टक्के कार्यान्वित करण्याची जबाबदारी संबंधित विभागाची राहिल. याबाबत निविदा प्रसिध्द करुन करारनामा करणेची कार्यवाही सुरु करावी. तसेच निविदेत सर्व बाबी अंतर्भूत कराव्यात व अनावश्यक बाबी रद्द कराव्यात. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६९९ धुळे महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अंतर्गत शहरात विविध प्रभागांमध्ये विविध प्रकारचे पाणी पुरवठ्याची कामे करण्याकरिता मनुष्यबळ सेवा (अंशकालीन कामगार) पुरवठा करणेकामी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. कार्य.अभियंता धुळे मनपा पाणीपुरवठा विभागामध्ये विद्युत, वॉटर डिस्ट्रीब्युशन व कार्यालयीन कर्मचाऱ्यांकरीता निविदा काढण्यात आली होती. मे. सावित्रीमाई सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था, धुळे यांना ठेका दिला होता. याबाबत कर्मचाऱ्यांच्या तक्रारी आल्या होत्या की, पगार वेळेवर होत नाही म्हणुन जोपर्यंत नविन टेंडर होत नाही तो पर्यंत त्यांचा पगार मनपा फंडातुन देण्याचे महासभेची मंजुरी घेण्यात आली होती. मध्यंतरी २ वेळा निविदा काढली गेली परंतु चांगला प्रतिसाद न आल्यामुळे ती निविदा रदद करण्यात आली. त्यामुळे त्यांचा पगार आजतागायत मनपा फंडातुन करण्यात येत आहे. त्यामुळे सदर कामाची निविदा काढणे व होणाऱ्या खर्चास मंजुरीस्तव सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक कंत्राटदाराला या बदल्यात काय मिळेल.

मा. कार्य.अभियंता जो त्याचा एकुण खर्च होईल त्याच्यावर टक्केवारी दराने त्याचे अॅडमिनीस्ट्रेशन चार्जेस दिले जातील. त्याने एकुण रक्कमेवर सेवा शुल्काची टक्केवारी त्याने कोट करायची आहे. त्याचा दरमहा खर्च १८ लाख १४ हजार रुपये आहे. आणि सदर निविदा ३ वर्षाकरीता काढायची आहे. सदर ठेक्याचा कालावधी २ महिन्यात अंतिम स्वरुप येईल, तोपर्यंत सदर कर्मचाऱ्यांचा पगार मनपा फंडातुन करावा अशी विनंती आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक ई निविदा लवकर प्रसिध्द करावी. तसेच सेवा शुल्काला कॅपिंग करावे. निविदेत स्पष्ट अट टाकावी. शासकीय नियमाप्रमाणे कॅपिंग करावे. तोपर्यंत मनुष्यबळ जे आहे त्याचे देयक अदा करावे. देयके अदा करतांना विभाग प्रमुखांची सर्टिफिकेट घ्यावी. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६७७ दिनांक ०२/०२/२०२६**

पाणी पुरवठा विभागात दैनंदिन पुरवठा व्यवस्थेत व्हॉलमन, सुरक्षा रक्षक आणि इतर आवश्यक कर्मचारी पुरविण्यासाठी मे. सावित्रीमाई सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था धुळे यांना ठेका देण्यात आलेला होता. दिनांक २३.०९.२०२४ रोजी त्यांच्या आस्थापनेवरील धुळे महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकरिता काम करत असणाऱ्या कर्मचार्यांनी मा. आयुक्त तथा प्रशासक यांना निवेदन दिलेले होते की त्यांना त्यांचे मानधन अथवा पगार कोणत्याही महिन्यात वेळेवर मिळत नाही. तसेच मे. सावित्रीमाई सुशिक्षित बेरोजगार सेवा

सहकारी संस्था धुळे यांचा ठेका रद्द करून सर्व कर्मचारी यांना महानगरपालिका आस्थापनेवर मानधन तत्वावर घेण्यात यावे.

पाणीपुरवठा अत्यावश्यक सेवे संबंधित ठेकेदार संस्थेच्या अनियमिततेमुळे अडचणी निर्माण होत असल्यामुळे मे. सावित्रीमाई सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था धुळे यांचा ठेका रद्द करण्यात आला. तसेच सदर सेवा अत्यावश्यक स्वरुपाची असल्याने पुढील नवीन संस्था नियुक्ती प्रक्रिया व कार्यवाही होईपावेतो सदर ठेक्यातील कार्यरत कर्मचारी यांना ठेकेदारामार्फत देय असलेले मानधन मनपा निधी अंतर्गत देण्याचा प्रशासकीय महासभेत निर्णय घेण्यात आलेला होता.

त्या अनुषंगाने मे. सावित्रीमाई सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था धुळे यांच्या आस्थापनेवर असलेल्या कर्मचाऱ्यांचा  माहे ऑगस्ट २०२४ पासून ते माहे नोव्हेंबर २०२५ पर्यंतचे वेतन मनपा निधीअंतर्गत करण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत पाणीपुरवठा विभागात कुशल, अकुशल व अर्धकुशल असे एकूण १२० कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. सध्यस्थितीत त्यांना मार्फत मासिक रु. १४,२२८/- मात्र इतके वेतन देण्यात येते. परंतु सदर कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन करण्याचे महाराष्ट्र शासन नगरपरिषद संचनालय कार्यालय, बेलापूर, नवी मुंबई यांच्या मार्फत कळविण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने किमान वेतन अधिनियम ,१९४८अंतर्गत विविध परिमंडळनिहाय कुशल, अकुशल व अर्धकुशल कर्मचारी यांचे किमान मासिक मूळ वेतन दर जाहीर केलेले आहे. तरी सदर मासिक रु.१८,१४,८३०.०० या रक्कमेकरिताच्या तीन वर्षे मुदतीच्या कामाची ठेकेदाराकडून टक्केवारीने सेवाशुल्काचे दर मागविण्याकरिता ई निविदा प्रक्रिया राबविण्याच्या तसेच सदर कामाकरिताच्या वार्षिक रु. २,१७,७७,९६०/- मात्र आणि तीन वर्षाकरिता रु ६,५३,३३,३८०/- मात्र खर्च अपेक्षित असल्याने सदर खर्चास  मंजुरी घेणे आवश्यक असल्याने उपरोक्त विषय मे स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अंतर्गत शहरात विविध प्रभागांमध्ये विविध प्रकारचे पाणी पुरवठ्याची कामे करण्याकरिता मनुष्यबळ सेवा (अंशकालीन कामगार) पुरवठा करणेकामी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता  देणेत येत आहे. तसेच ई निविदा कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

ई निविदा प्रक्रिया होईपावेतो पाणीपुरवठा विभागात कुशल, अकुशल व अर्धकुशल असे एकूण १२० कंत्राटी कर्मचारी यांना मनपा मार्फत मानधन अदा करावे तसेच शासकीय नियमानुसार  सदर निविदेत कोटींग करण्यास कॅपिंग ठेवण्यात यावे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-७०० धुळे महानगरपालिका जागेतुन व्यक्तींना काढुन टाकणे व थकबाकी भाडयाची रक्कम व नुकसान भरपाईच रक्कम वसुल करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६७८ दिनांक ०२/०२/२०२६**

धुळे महानगरपालिका जागेतुन व्यक्तींना काढुन टाकणे व थकबाकी भाडयाची रक्कम व नुकसान भरपाईची रक्कम वसुल करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ८१-ब व कलम ८१-क अन्वये विविध नोटीसा कलम ४७२ ते कलम ४७७ मध्ये विहित नोटीसांवर आयुक्तांच्या मान्यतेने संबंधित विभागाचे उपायुक्त यांना स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच नोटीसेस बजावण्यास संबंधित विभागाचे प्रमुख अथवा संबंधित विभागातील कर्मचारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमय प्रकरण आठ (अ) अन्वये चौकशी करणे कोणत्याही बाबतीत महानगरपालिका आयुक्त अथवा विशिष्ट प्रकरणात महानगरपालिका आयुक्त यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी अथवा व्यक्ती (विधी सल्लागार, विधी तज्ञ इ.) यांना आवश्यक चौकशी करता येईल.

त्यानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ८१ अन्वये प्रस्तावात नमूद नियमावलीस मान्यता देणेत येत आहे. तसेच त्यानुसार कार्यवाही करणेस वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-७०१ धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ करीता मतदार यादी छपाई करणे करीता आलेल्या खर्चाची रक्कम अदा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. सहा.आयुक्त धुळे मनपा सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता मतदार यादी छपाई करणेसाठी तातडीने सदर कामे करणेत आली होती. धुळे विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दर मागविले असता सदरचे दर हे ७५ पैसे प्रति प्रत असल्याने सदरचा पुरवठाधारकाकडुन सदर काम करुन घेण्यात आलेले आहे. बिल अदा करण्यासाठी सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक मतदार यादी विक्रीचा दर काय होता.

मा. सहा.आयुक्त रु. २ प्रति पान

मा.आयुक्त तथा प्रशासक सर्व अटी शर्तीसह व वस्तुस्थितीसह मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६७९ दिनांक ०२/०२/२०२६**

धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ करीता मतदार यादी छपाई करणे अत्यंत ताताडीचे असल्याने सदरचे कामे करणे करीता धुळे मनपा भांडार विभाग मार्फत ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती.

तरी सदर निविदा मध्ये २ निविदाधारक यांनी सहभाग घेतलेला असता त्यामध्ये कमी दर हे मे.आनंद एन्टरप्राईजेस, अमळनेर यांचे असुन सदर संपुर्ण निविदा दरामध्ये झेरॉक्स प्रति काढणे करीता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| अ.क्र. | साहित्य तपशिल | दर |
|---|---|---|
| ५० | A४ Size Peper Zerox/Print | प्रति झेरॉक्स रु.२/- |

| | | |
|---|---|---|
| ५१ | Legal Size Peper Zerox/Print | प्रति झेरॉक्स रु.२/- |

त्याअनुषंगाने सदरचे काम तातडीचे असल्याने धुळे विधनसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने निवडणुक कामी झेरॉक्स काढण्यासाठी मा. जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत देण्यात आलेल्या कामाच्या आदेशानुसार मे.श्री विष्णु दिलीप प्रिन्टींग प्रेस अण्ड झेरॉक्स यांना आदेशति करण्यात आले होते त्या अुनषंगाने सदर पुरवठाधारक यांच्यकडेस तपास केला असता त्यांनी मिळालेल्या आदेशानुसार धुळे मनपा यांच्याकडील काम करण्यास मान्यता दर्शविलेली असुन त्यांचे दर खालील प्रमाणे प्राप्त झालेले आहेत.

| **अ.क्र.** | **साहित्य तपशिल** | **दर** |
|---|---|---|
| १ | A४ Size Peper Zerox/Print | प्रति ०.७५ पैसे |

तरी सदरचे सेवा धारक यांनी धुळे महानगरपालिका कडील यापुर्वीचे कामे व कार्यालयीन कामा करिता तातडीची सेवा पुरविलेली आहे त्यांचे काम चांगले व सुव्यवस्थित तसेच वेळेच्या आत पुर्तता करीत असतात.

तसेच सदर काम तातडीचे असल्याने सदर पुरवठा धारक यांना मागील अनुभव पहाता काम करणे करीता सुचित केलेले होते त्याअनुषंगाने त्यांनी निवडणुक प्रक्रीये मध्ये वेळेच्या आत संपुर्ण काम पुर्ण केलेले आहे त्यानुसार त्यांच्यकडुन कामे करुन घेण्यात आलेले आहे .

मे.श्री विष्णु दिलीप प्रिन्टींग प्रेस अण्ड झेरॉक्स यांचेकडून विधानसभा मतदार यादी, प्रारुप मतदार यादी, अंतिम मतदार यादी व मतदान केंद्र निहाय मतदार यादी छपाई व झेरॉक्स करण्यात आलेली आहे. त्याकामाचे त्यांनी एकूण सर्व रुपये **१३,८१,१४१/- मात्र** (जीएसटीसह) बिल सादर केलेले आहे.

मनपामार्फत प्राप्त झालेल्या याद्या विक्री करण्यात आलेल्याअसता त्यामधुन **रु.१५,५२,५३४/-** मात्रचे उत्पन्न प्राप्त झालेले आहे.

त्यानुसार झेरॉक्स कामा करीता रु. **१३,८१,१४१/-** मात्र खर्च झालेला आहे सदर प्रसिध्द केलेल्या ई-निविदा मध्ये जास्तीचे दर असल्याने संबधित पुरवठाधाकर याचेडुन कमीत कमी दराने कामे करुन घेण्यात आलेले आहे त्यामुळे धुळे मनपाचे आर्थीक बचत करण्यात आलेली असुन सदरच्या पुरवठाधारक यांचे बिल अदा करण्यास मे स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, मे.श्री विष्णु दिलीप प्रिन्टींग प्रेस अण्ड झेरॉक्स यांच्यामार्फत धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ करीता मतदार यादी छपाई करणे करीता झालेला खर्च रुपये **१३,८१,१४१/- मात्र** (जीएसटीसह) अदा करणेस वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-७०२ — धुळे शहर ग्राहक पाणी मीटर बसविण्याकामी 'सविस्तर प्रकल्प अहवाल' (DPR) तयार करण्यासाठी 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार' (PMC) यांची नियुक्ती करण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. आयुक्त तथा प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६८० दिनांक ०२/०२/२०२६**

धुळे महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा सुरळीत नियोजन करण्यासाठी आणि पाणी पट्टी वसुलीत अचूकता आणण्यासाठी ग्राहक पाणी मीटर (Consumer Water Meter) बसविणे प्रस्तावित आहे. या कामासाठी राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध योजनांतून निधी प्राप्त करण्याकामी एक 'सविस्तर प्रकल्प अहवाल' (DPR) तयार करणे आवश्यक आहे.

संदर्भित पत्राद्वारे यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स LLP (YIS), छत्रपती संभाजीनगर यांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून काम करण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे. संस्थेने यापूर्वी छत्रपती संभाजीनगर, जळगाव, सोलापूर आणि सिमला महानगरपालिका तसेच विविध नगरपरिषदांसाठी पाणी मीटरिंग संदर्भात DPR तयार करण्याचे काम यशस्वीरीत्या केले आहे. संस्थेकडे १९० पेक्षा जास्त तज्ञ अभियंते आणि आधुनिक सॉफ्टवेअर (MS Project, Primavera) उपलब्ध आहेत.

केवळ मीटर बसवणे नव्हे, तर 'इंटिग्रेटेड वॉटर मॅनेजमेंट सिस्टिम' (डेटा गेटवे, बिलिंग इंटिग्रेशन, रिअल-टाइम मॉनिटरिंग) विकसित करण्याचा संस्थेचा अनुभव आहे. तसेच यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स LLP (YIS) आपली फी प्रकल्प अहवालात समाविष्ट करण्यास तयार असून, त्यांची फी प्रकल्प मंजुरी नंतर देय राहील. तज्ज्ञ सल्लागारांमार्फत DPR तयार केल्यामुळे केंद्र व राज्य शासनाकडून निधी मिळण्यास तांत्रिक सुलभता येईल.

यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स LLP यांनी सादर केलेली कागदपत्रे आणि त्यांचा अनुभव पाहता, धुळे शहराच्या पाणी मीटर प्रकल्पासाठी मे. यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स LLP (YIS) यांना 'सविस्तर प्रकल्प अहवाल' (DPR) तयार करणे व त्यांची 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार' (PMC) म्हणून नियुक्ती करण्याबाबत व सदर प्रकल्प अहवाल शासनास मंजुरीस्तव तसेच अनुदान प्राप्त होणे करिता मे. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने उपरोक्त विषय मे. स्थायी समिती सभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे शहर ग्राहक पाणी मीटर बसविण्याकामी 'सविस्तर प्रकल्प अहवाल' (DPR) तयार करण्यासाठी 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार' (PMC) म्हणून मे. यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स LLP (YIS) यांची नियुक्ती शासन दरास करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच याकामी शासनस्तरावरील विविध योजनेतून तथा जिल्हा नियोजन मंडळामार्फत निधी मागणी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच सदर प्रकल्प अहवालास शासन मान्यता व निधी उपलब्धतेनंतर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास शुल्क अनुज्ञेय राहील अशी स्पष्ट अट निविदा प्रक्रियेत व करारनाम्यात टाकण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-७०३ धुळे महानगरपालिकेच्या नवीन आर.टी.ओ. ऑफिस येथील मलशुद्धीकरण केंद्रात 'टर्शरी ट्रीटमेंट प्लांट' (Tertiary Treatment Plant) बांधणे व ते पाणी सोनवद प्रकल्पापर्यंत पोहोचविण्याकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्त करण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक महासभेचे जेवढे विषय आहे तेवढे याच बैठकीत मंजुर करुन कायम करण्यात येत आहे. आवश्यकता भासल्यास फक्त बैठक महासभेची लावावी. स्थायी समिती बैठक मात्र चालु ठेवावी लागेल, जोपर्यंत स्थायी समिती अस्तित्वात येत नाही. नविन विषय महासभेत ठेवले जाणार नाही. मनपा सदस्य त्याबाबत निर्णय घेतील.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६८१ दिनांक ०२/०२/२०२६**

धुळे महानगरपालिकेकडून नवीन आर.टी.ओ. ऑफिस येथील मलशुद्धीकरण केंद्रात (STP) शहरात जमा होणारे सुमारे १७ MLD सांडपाणी शुद्ध केले जाते. सध्या हे पाणी नदीमध्ये सोडून दिले जाते. महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या सूचनांनुसार, एकूण पाणी वापराच्या ३० टक्के पाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक आहे. हे सांडपाणी पुनर्वापरायोग्य करण्यासाठी त्यावर 'टर्शरी ट्रीटमेंट' प्रक्रिया करणे आणि ते पाईपलाईनद्वारे सोनवद प्रकल्पापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.ज्यामुळे महानगरपालिकेला अक्कलपाडा येथे भरावी लागणारी पाणीपट्टी कमी होऊन महानगरपालिकेची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.

सदर कामासाठी मानवसेवा कन्सल्टंट, धुळे यांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. सदर संस्था महाराष्ट्र शासनाच्या नगरपरिषद प्रशासन संचालनालय आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) यांच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या नामिका सूचीमध्ये (Empaneled List) समाविष्ट आहे. अर्जात महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाच्या विविध शासन निर्णयांचा उल्लेख करण्यात आला आहे, ज्यानुसार संस्था सल्लागार म्हणून काम करण्यास पात्र आहे. त्यांची फी प्रकल्प मंजुरी नंतर देय राहील. तज्ज्ञ सल्लागारांमार्फत DPR तयार केल्यामुळे केंद्र व राज्य शासनाकडून निधी मिळण्यास तांत्रिक सुलभता येईल.

शहराच्या वाढत्या पाण्याची गरज आणि शासनाचे सांडपाणी पुनर्वापराचे नियम पाहता, 'टर्शरी ट्रीटमेंट प्लांट' उभारणे आवश्यक आहे. सदर प्रकल्प तांत्रिक स्वरूपाचा असल्याने, नियोजनापासून ते अंमलबजावणीपर्यंत तज्ज्ञ सल्लागाराची (PMC) आवश्यकता आहे.

मानवसेवा कन्सल्टंट हे शासन नियुक्त नामिकेवर असल्याने, त्यांच्या नियुक्तीबाबत विचार करणे तांत्रिकदृष्ट्या सोयीचे ठरेल. पर्यावरणाचे रक्षण आणि पाण्याचा प्रभावी पुनर्वापर करण्याच्या दृष्टीने, नवीन आर.टी.ओ. ऑफिस येथील १७ MLD मलशुद्धीकरण केंद्रात टर्शरी ट्रीटमेंट प्लांट बांधणे व पाईपलाईनद्वारे पाणी सोनवद प्रकल्पापर्यंत नेण्याच्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त मंजुरीस्तव प्रस्ताव मे. स्थायी समितपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिकेच्या नवीन आर.टी.ओ. ऑफिस येथील मलशुद्धीकरण केंद्रात 'टर्शरी ट्रीटमेंट प्लांट' (Tertiary Treatment Plant) बांधणे व ते पाणी सोनवद प्रकल्पापर्यंत पोहोचविण्याकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून मानवसेवा कन्सल्टंट यांना शासन दरानुसार नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच याकामी शासनस्तरावरील विविध योजनेतून तथा जिल्हा नियोजन मंडळामार्फत निधी मागणी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच सदर प्रकल्प अहवालास शासन मान्यता व निधी उपलब्धतेनंतर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास शुल्क अनुज्ञेय राहील अशी स्पष्ट अट निविदा प्रक्रियेत व करारनाम्यात टाकण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**